17-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/17/2025 12:08 AM Page 1



# इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखेतर्फे २० रक्त दात्यांचा सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १६** : १४ जून हा जागतिक रक्त दाता दिन म्हणून साजरा केला जातो. आज अनेकजण रक्तदान करतात म्हणून कित्तेकवेळा अनेकांचे प्राण वाचतात परंतु या रक्तदात्यांची म्हणावी तशी दाखल कुणी घेत नाही. म्हणून इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखेतर्फे अशा रक्तदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व रक्तदानाबद्दल जागृती करण्यासाठी जागतिक रक्तदाता दिनी २० रक्तदात्यांचा स्मृति चिन्न, प्रशस्ती पत्रक, कुटुंबासाठी भेट देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गोवा मेडिकल कॉलेजचे हृदय शल्य विशारद डॉ. जगन्नाथ कोलवाळकर उपस्थित होते.




**म्हापसा : सन्मान पात्र रक्त दत्त्यांसोबत माध्यभागी बसलेले डॉ. जगन्नाथ कोलवाळकर, प्रा. सुभाष कौठणकर, मेहबूब विराणी, डॉ. दिगंबर नाईक व इतर**

यावेळी व्यासपीठावर रेड क्रॉस बार्देश शाखेचे अध्यक्ष प्रा. सुभाष कौठणकर, उपाध्यक्ष डॉ. दिगंबर नाईक, सचिव ॲड. ईशान उसापकर, खजिनदार मेहबूब विराणी, रेड क्रॉसचे व्यवस्थापकीय सदस्य सलीम इसानी उपस्थित होते.

डॉ. कोलवाळकर म्हणाले की, रक्तदान ह श्रेष्ठ दान आहे. एका रक्त दात्यामुळे तीन रुग्णांचा प्राण वाचू शकतो. आज प्रत्येक शस्त्रक्रियेवेळी रक्ताची नितांत गरज भासते. अनेकवेळा वेळीच एखादा रक्त गट उपलब्ध न झाल्याने शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागतात. या परिस्थितीवर मात करण्यासाठी जनजागृती करून रक्तदात्याची साखळी वाढवली पाहिजे. या साठी तरुण वयातच युवकांना रक्तदानचे महत्व पटवून दिले पाहिजे. या साठी इंडियन रेड क्रॉस सोसायटी सारख्या संस्थानी पुढाकार घेऊन गावागावात जाऊन तसेच महाविद्यालयात जाऊन तरुणांना रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले. रक्ताची गरज ओळखून सरकारनेही अशा उपक्रमाना प्रोत्साहन दिले पाहिजे. आज रक्तदानात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी होतात ही चांगली गोष्ट आहे, असे ते म्हणाले.

आज सन्मान केलेल्या रक्तदात्यांमध्ये दहा ते एकशे दोनवेळा रक्तदान केलेल्या सतीश गवंडळकर (१० वेळा) आनंद कुलकर्णी, गिरिधर राऊळ, मनोज सावंत, हर्षद परब, कुलदीप कामत, रोहन मणेरकर, समीर सावंत, पुंडलिक राऊळ, सोनल पांढरे, महेश रेमुलकर, राजेश दळवी, सविओ पेरेरा, दयानंद देसाई, सॅम ब्रागांझा, पद्मानाथ गडेकर, लीना गोवेकर, जेम्स गोंसालवेस, ऐशली डिलेनी, संदीप वालावलकर (१०२ वेळा) या रक्त दत्यांचा समावेश होता.

यावेळी संदीप वालावलकर, लीना गोवेकर, एशले डिलाने, सॅम ब्रागाझा, डॉ. दिगंबर नाईक यांनी रक्तदानचे महत्त्व सांगितले. प्रा. सुभाष कौठणकर यांनी स्वागत केले. डॉ. हेथल भक्ता यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. नीता कौठणकर यांनी रक्तदात्यांची ओळख करून दिली. संतोष ढेकणे यांनी आभार मानले. तर ॲड. ईशान उसपकर यांनी सूत्रसंचालन केले.

पान १ वरून

## अन्न सुरक्षा मोहिमेंतर्गत ८० धाडी !



आम्ही लगेचच कारवाई करत हे मांस नष्ट केलं आणि संस्थेला नोटीस बजावली, असे त्या म्हणाल्या.

गोव्याच्या फळ बाजारात सध्या कृत्रिम पिकवणं ही चिंतेची बाब ठरत आहे. केळी, आंबा यांसारख्या फळांमध्ये इथिलीन गॅसचा अतिरेक आढळल्यामुळे एफडीएने मोठ्या प्रमाणावर अशा फळांची नासधूस केली. विशेषतः बार्देश आणि साष्टी तालुक्यांमध्ये अशा प्रकारचे प्रमाण जास्त आढळले.फळ कृत्रिमरित्या पिकवण्यामुळे त्यांचे पोषणमूल्य कमी होते आणि आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आमचा या गोष्टीवर विशेष भर आहे,असे देसाई म्हणाल्या. त्यांच्या मते, सध्या दक्षिण गोव्यात तीन कृत्रिम पिकवण्याचे कक्ष अस्तित्वात आहेत, पण उत्तर गोव्यात एकही अधिकृत पिकवणी कक्ष नाही, ही बाब चिंतेची आहे.

छाप्यांबरोबरच एफडीएने खाद्य विक्रेत्यांना प्रशिक्षण देण्यावर भर दिला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे, पण जे विक्रेते सुधारणा करू इच्छितात त्यांना मार्गदर्शनही दिले जात आहे. आम्ही कुठेही केवळ दडपशाही करत नाही. विक्रेत्यांना फूड सेफ्टी ॲक्ट, लेबलिंग, साठवणूक याबाबत माहिती दिली जाते, असे त्या म्हणाल्या.

देसाई यांनी असेही सांगितले की, एफडीएने जारी केलेल्या आदेशाचे पालन न करणाऱ्या रेस्टॉरंट्सवर सीलबंद कारवाई केली जात आहे. मडगावमधील एका रेस्टॉरंटने आमचे निर्देश दुर्लक्षित केल्याने आम्ही ते बंद केलं, असे त्या म्हणाल्या.

राज्यभरात सुरू असलेल्या अन्न सुरक्षा मोहिमेचा प्रभाव आता स्पष्ट दिसत आहे. पर्यटन हंगाम आणि वाढत्या ग्राहक तक्रारी लक्षात घेता, एफडीएने अन्न विक्रीतील गुणवत्ता व सुरक्षितता याकडे अधिक गांभीर्याने लक्ष दिले आहे. ही मोहीम एक आरोग्यदृष्ट्या आवश्यक पाऊल ठरत असून, तिचा व्यापक परिणाम होण्याची अपेक्षा आहे.

## रस्ते अपघातांत 'रेंटल व्हेइकल्स'चा वाढता वाटा ?

बेजबाबदारपणे वागतात. आम्ही लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन काही सूचना मांडणार आहोत, असे चोडणकर यांनी सांगितले.

टॅक्सी चालक रोहन कांदोळकर यांनी वाहन मालकांना भोगाव्या लागणाऱ्या अडचणी उघड करत एक अनुभव सांगितला.एका पर्यटकाने गाडी घेतली, दारूच्या नशेत ती चालवली आणि पोलिसांनी ती जप्त केली. दुसऱ्या दिवशी न्यायालयात उपस्थित राहण्याचा आदेश देण्यात आला. पण पर्यटक फरार झाला. परिणामी मालकाला वकील नेमून स्वतः कोर्टात जावे लागले. अशा घटना सामान्य झाल्या आहेत, अशी तक्रार कांदोळकर यांनी केली.

गोवा कलेक्टिव्ह ॲक्शन नेटवर्कचे संयोजक रोनाल्ड मार्टिन्स यांनी या समस्येवर सरकारने गांभीर्याने पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

सरकारने अपघातांची कारणमीमांसा ओळखली आहे, आता कृती आराखडाही हवा. जिल्हा रस्ते सुरक्षा समित्यांमध्ये ही बाब तातडीने मांडली जावी, असे मार्टिन्स यांनी सूचित केले.

गोवा रस्ते सुरक्षा मंचाचे अध्यक्ष दिलीप नाईक यांनीही मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याचे स्वागत करताना सांगितले की, आम्ही या समस्येबद्दल आधीच बोलत होतो, पण जेव्हा राजकीय नेते अशी वक्तव्ये करतात तेव्हा प्रशासनाकडून कृती होण्याची शक्यता अधिक असते.

रेंटल वाहनांच्या अपघातांबाबत यापूर्वीही गंभीर घटना घडल्या आहेत. फेब्रुवारी २०२४ मध्ये जुन्या मांडवी पुलावर रेंट–ए–कारने जोरदार धडक दिल्यानंतर एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला होता. ही घटना पर्यटकांनी वाहन चालवताना दाखवलेली बेफिकिरी अधोरेखित करणारी होती.

या प्रकरणानंतर माजी मंत्री चर्चिल आलेमाव यांनी रेंट–ए–कॅब व्यवसायासाठी कडक नियमन आणण्याची मागणी केली होती. पर्यटकांना गाड्या भाड्याने देताना लागू असलेले नियम इतके शिथिल का आहेत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता.

घटनांची वाढती मालिका पाहता वाहतूक विभागाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक संचालक पी. प्रविमल अभिषेक यांनी सर्व सहाय्यक वाहतूक संचालकांना निर्देश दिले आहेत की भाडेकरू वाहनांवर विशेष लक्ष ठेवून त्यांची तपासणी केली जावी, स्पीड गव्हर्नर कार्यरत आहे की नाही, याची पडताळणी करण्यात यावी.

# हरमल बामणभाटीत वडाचे जीर्ण झाड पडून ६० हजाराचे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १६** : बामणभाटी भाटले रस्त्यावरील जीर्ण वडाचे झाड लोखंडी गेटवर कोसळून अंदाजे ६० हजाराचे नुकसान झाले.पेडणे अग्निशमन दलाच्या जवानांनी सदरचा रस्ता मोकळा केला.

काल सकाळी ७ च्या सुमारास माजी सरपंच प्रदीप नाईक यांच्या गेट बाहेर असलेले वडाचे झाड पूर्णतः गेटवर कोसळले तसेच दोन स्कूटर झाडाखाली पडल्याने त्याचे अतोनात नुकसान झाले.स्कूटरचे अंदाजे ४० हजाराचे नुकसान झाले.

ह्या घटनेत वीज पुरवठा खंडित झाला व वाहि ण्याचे बरेच नुकसान झाले.ह्यावेळी अग्निशमन दलाचे अधिकारी जयराम शेटगावकर,जवान राजेश परब,मयूर नाईक,आशीर्वाद नाईक व रजत नाईक आदींनी परिश्रम घेतले.

दरम्यान,वीज खात्याच्या कर्मचाऱ्यांनी सकाळपासून अथक परिश्रम घेत त्या वाड्यावरील वीज पुरवठा सुरळीत केला.ह्या भागात अनेक जीर्ण झाडे असून पावसाळ्यात तसेच वादळामुळे कोसळू शकतात,असे नागरिकांनी सांगितले.



**बामणभाटी भाटले रस्त्यावर वडाचे झाड कोसळून वाहतूक काही काळ खंडित झाली**

**CHANGE IN NAME**

I **DASTAGIR ALI SHAIKH** R/O A/2 208 2ND FLOOR SURYA KIRAN RESIDENCY ODLEM BHAT SANTA CRUZ TISWADI GOA like to change my name from **DASTAGIR ALI HUSSAN SHAIKH** to **DASTAGIR ALI SHAIKH.** Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **DASTAGIR ALI SHAIKH.**

**CHANGE OF NAME**

I, **Satchel Costa** D/O FRANCISCO ABELO COSTA, r/o H.No. 77, Amblai Panchwadi Goa. Have changed my name From **Satchel D'costa** to **SATCHEL COSTA** for all future purposes.

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR - II OF BARDEZ TALUKA, MAPUSA, GOA**

**Case No: JM-II / TNC / PUR / Parra / 05 / 2025**

Custadio Fernandes alias Custodio Fernandes (since deceased through his legal heirs) 1. Smt. Angelina Esmeralda Lobo, w/o late Custadio Fernandiz alias Custodio Fernandes, aged 71 years, widow, agriculturist 2. Mr. Vigilio Thomas Fernandes, s/o late Custadio Fernandiz alias Custodio Fernandes, aged 38 years, married, service / agriculturist 3. Mrs. Delilah Fatima Miranda, w/o Virgilio Thomas Fernandes, aged 36 years, married, housewife 4. Mrs. Velinda Fernandes, d/o late Custadio Fernandiz alias Custodio Fernandes, w/o Terence Gregory Camilo, aged 37 years, married, housewife 5. Mr. Terence Gregory Camilo, s/o Mr. Santano Clemente Ignatius Camilo, aged 40 years, married, service, all r/o H. No. 137/2, Lobo Vaddo, Parra, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. The Administrator of Communidade of Bardez at Mapusa, Bardez, Goa 2. The Attorney Communidade of Parra, Parra, Bardez, Goa ....Opponents

**PUBLICATION NOTICE**

To The Opponents

WHEREAS, the applicants above named have made an application dated 11.10.2024 which was inwarded in this office on 20.01.2025 u/s 18-C of the Goa Daman & Diu Agricultural Tenancy Act 1964 for purchase with regards to property bearing Survey No. 126/4 situated at Parra, Bardez, Goa in this Court against oponents.

AND WHEREAS, the applicant stated in his application that the notice sent to the opponent by registered A.D. is returned unserved with postal remark "not known, return to sender". The applicant has therefore prayed for substitute service as he is not aware of any other address of the opponent, by way of publication in the local newspaper and the same has been granted by this Court being genuine.

AND WHEREAS, this Court is satisfied that this is a fit case for ordering such service. Now therefore notice is hereby given to you under order V of Rule 20(1A) of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by an agent duly instructed and able to answer all material question relating to the application on **07/07/2025 at 10.30 a.m.** failing which the application shall be heard and determined ex-parte.

Given under my hand and seal of this court on this 9th day of June 2025.

Sd/- **Shannon Chika de Almeida**
Joint Mamlatdar II of Bardez Taluka
Mapusa, Goa
Seal

**TRANSFER OF VEHICLE**

I, **SMT. SNEHALATA JAYANT KAMAT** wife of **DR. JAYANT RANGANATH KAMAT** R/o, H.NO 168/8-2, UPPER BAZAR, PONDA - GOA would like to transfer the (SKODA SLAVIA Bearing Reg. No.GA-05-F-7563 AND POLO GT Bearing Reg. No. GA-05-D-4893) on my name. Any person having any claim or objection in this regards shall intimate to the Asst. Director of TransportRTO, Ponda - Goawithin 15 days from the date of publication of the notice.

SD/- **SMT. SNEHALATA JAYANT KAMAT**

**CHANGE OF NAME**

I, **Salisha Costa** D/O FRANCISCO ABELO COSTA, r/o H.No. 77, Amblai Panchwadi Goa. Have changed my name From **Salisha A. D'costa** to **SALISHA COSTA** for all future purposes.

# अर्धफोंड येथील बलराम विद्यालयात साने गुरुजी पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १६** : अर्धफोंड–पैंगीण, काणकोण गोवा येथील बलराम उच्च माध्यमिक विद्यालयात आदरणीय लोकप्रिय लेखक पांडुरंग सदाशिव साने उर्फ श्याम उर्फ सानेगुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन आज रोजी, करण्यात आले.

यावेळी प्रभारी शिक्षिका सौ कविता गावकर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी कु. प्रणाली गावकर हिने साने गुरुजी विशेष माहिती सांगितली. शिक्षिका सौ. आरती पैंगीणकर हिने लोकप्रिय पांडुरंग सदाशिव साने यांचा आदर्श आजच्या युवा पिढी समक्ष ठेवला. विद्यार्थ्यांना वाचन करण्यास प्रेरित केले.

विद्यालयाच्या मराठी विभागा अंतर्गत निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये कु. वृतिका नाईक, हेमा भगत, वेदिका सावईकर, करुणा गावकर, स्वीटी वेळीप, रश्मी दयकर, रुत्विक वेळीप, प्रज्योत गावकर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ लेखन करुन बक्षिस मिळवले. प्रभारी शिक्षिका तसेच इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन शाबासकी दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी कु. प्रणाली गावकर हिने केले.



**अर्धफोंड–पैंगीण, येथील बलराम उच्च माध्यमिक विद्यालयात लोकप्रिय लेखक पांडुरंग सदाशिव साने उर्फ श्याम उर्फ सानेगुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमात तस्वीरीलाला हार अर्पण करताना प्रभारी शिक्षिका कविता नाईक गावकर व बाजूला विद्यार्थीनी व इतर.**

**VILLAGE PANCHAYAT TUEM, BHOMWADA TUEM PERNEM -GOA**

No.VP/TUEM/PER/Quot-Notice/25-26/ 245 Date:16/06/2025.

**NOTICE INVITING QUOTATIONS**

Sealed lowest rates quotations are invited on behalf of the Village Panchayat Tuem, Pernem Goa, from the reputed dealers for supply of electric materials for the Work Construction of Market Complex with shops and other on existing old Panchayat Building wards no. 06 at Bhomwada of V.P Tuem Pernem Goa.

The sealed quotations should reach this office of Village Panchyaat Tuem, Pernem - Goa on or before **27/06/2025 by 12.00 Noon.** and will be opened on **28.06.2025 at 10.30 a.m..** The lowest quotation will be considered after approval from competent Authority.

The right to accept or reject any or all the quotations is reserved by the Office of V.P. Tuem, Pernem - Goa without assigning any reason thereof.

The quotations should be accompanied with PAN card copy and GST registration.

List to be obtained from the Village Panchayat office.

The payment will be made after the completion of works.

The amount should be quoted per item wherever applicable, with all taxes and fees and transportation charges.

The supplier shall supply the goods/items within 7 days from receipt of supply order.

For any more details contact Office of V.P. Tuem, Pernem - Goa.

Seal Sd/- (Mrs. Anita Anand Salgaonkar) Sarpanch, Village Panchayat Tuem, Pernem Goa

**VILLAGE PANCHAYAT NETORLIM SANGUEM GOA**

Ref No.VPN/SAN/QTN/2025-26/ 320

Date :- 16/06/2025

**QUOTATION NOTICE**

Sealed Quotations are hereby invited by VP. Netorlim from eligible dealers for supply of 300 Life Jackets. The quotations should reach the Office of the Sarpanch, Village Panchayat of Netorlim on or before **23/06/2025 by 11:00 am.** The same will be opened on the same day at **12 noon.**

The detail requirements are given below:

**1.** Life Jacket Type III or Type V with BIS Safety Norms.

Sd/- (Bunda Varak) Seal
Sarpanch,
Village Panchayat Netorlim, Sanguem Goa

**SBI State Bank of India**

**शाखा–एसएआरबी ठाणे (11697),**
1 ला मजला, केरोम बिल्डींग, प्लॉट क्र. ए–112, वागळे औद्योगिक वसाहत,
सर्कल क्र. 22, ठाणे (पश्चिम) 400604. शाखेची ईमेल आयडी : **sbi.11697@sbi.co.in**

**कब्जा सूचना**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, **2002** (**2002** चा **54** वा) सदर कायद्याच्या कलम **13 (12)** सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, **2002** च्या नियम **3** खाली प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर दिलेल्या तारखांना मागणी सूचना पाठवल्या होत्या आणि सदर नोटीसा मिळाल्याच्या तारखेपासून **60** दिवसांच्या आत त्यात दिलेल्या रकमेची परतफेड करावी अशी मागणी सदर मागणी सूचनेत केली होती. कर्जदारांस या रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्याने कर्जदार व तमाम लोकांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली सही करणाऱ्याने सदर कायद्याच्या कलम **13 (4)** सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, **2002** च्या नियम **9** खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णिलेल्या **मालमत्तेचा भौतिक ताबा** सदर खात्यासमोर दिलेल्या तारखेस घेतला आहे.

खासकरून कर्जदार आणि तमाम लोकांना इशारा देण्यात येतो की त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि त्यांनी केलेला असा कोणताही व्यवहार स्टेट बँक ऑफ इंडियास देय असलेल्या येथे दिलेली रक्कम व यावरील व्याजाच्या रकमेच्या भारास लागू होईल.

| खाते /कर्जदार/ हमीदाराचे नाव व पत्ता | गहाण टाकलेल्या/ भार असलेल्या मालमत्तेचे वर्णन | कब्जा घेतल्याची तारीख | 1) मागणी सूचना तारीख 2) मागणी सुचनेनुसार देय रक्कम |
|---|---|---|---|
| **श्री. कृष्णा परेश कारापूरकर** **पत्ता** : फ्लॅट क्र. एआरजीएफ–**2**, तळमजला, आमोणकर रेसिडेन्सी, वासुदेव नगर, रोटरी क्लबशेजारी, मुस्लीम वाडा, डिचोली, उत्तर गोवा. | डिचोली तालुका, डिचोली, उत्तर गोवा येथील डिचोली नगरपालिका हद्दीत डिचोली गावाच्या सर्व्हे क्र. **38/1-**ए असलेल्या वासुदेव नगर या नव्या नावाच्या काझरेची मळी किंवा पाटाची मळी या नावाच्या मोठ्या मालमत्तेचा भाग असलेल्या **395** चौ.मी. क्षेत्रफळाच्या प्लॉट क्र. **25** वर बांधलेल्या आमोणकर रेसिडेन्सी या नावाच्या इमारतीच्या तळमजल्यावरील **64.00** चौ.मी. सुपर बिल्ट अप क्षेत्रफळाचा निवासी फ्लॅट क्र. एआरजीएफ–**2** आणि **चतु:सीमा : उत्तरेस** : बिल्डींगचा सेटबॅक व त्यानंतर प्लॉट क्र. **24**, **दक्षिणेस** : **8.00** मी. रुंद रस्ता, **पूर्वेस** : फ्लॅट क्र. एआरजीएफ–**1**, **पश्चिमेस** : बिल्डींगचा सेटबॅक व त्यानंतर प्लॉट क्र. **26**. | **10.06.2025** | 1) मागणी सूचना तारीख : **22.02.2024** 2) दि. **22.02.2024** रोजी रु. **26,60,480.00** (रु. सव्वीस लाख साठ हजार चारशे ऐंशी फक्त) अधिक सदर कायद्याच्या कलम **13 (2)** खाली या नोटीसीनुसार त्यापुढील व्याज, किमती व चार्जेस इ. |

दिनांक : **17.06.2025**
ठिकाण : ठाणे

**चंद्रकुमार डी. कांबळे**
**प्राधिकृत अधिकारी**
**स्टेट बँक ऑफ इंडिया – एसएआरबी ठाणे शाखा**

# डिचोली तालुका भंडारी समाजाच्या अध्यक्षपदी सतिश गावकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १६** : डिचोली तालुका गोमंतक भंडारी समाज समितीच्या अध्यक्षपदी माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक राजाराम उर्फ सतिश गांवकर , सरचिटणीसपदी प्रा.राजेश कळंगुटकर तर खजिनदारपदी सुभाष फोंडेकर यांची बहुमताने नियुक्ती करण्यात आली. केंद्रीय समितीचे अध्यक्ष उपेंद्र गांवकर , सरचिटणीस हनुमंत नाईक, खजिनदार दिलीप नाईक, उपाध्यक्ष संदीप वेर्णेकर, सचिव उमेश नाईक, केंद्रीय समिती सदस्य गोरखनाथ केरकर, सल्लागार तथा बैठकिचे निमंत्रक काशिनाथ मयेकर आदिंच्या उपस्थितीत डिचोली तालुका कार्यकारिणी बहुमताने निवडण्यात आली.

गोमंतक भंडारी समाजाची डिचोली तालुका कार्यकारिणी निवडण्यासाठी रविवारी १५ जून रोजी संध्याकाळी ५ वाजता डिचोली येथील हॉटेल यशोदा प्राईम सभागृहात खास बैठक संपन्न झाली असता सदर निवड करण्यात आली.

इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे

उपाध्यक्ष: शाम विष्णू हरमलकर, तुळशिदास उर्फ शाम शिरोडकर, विरेंद्र गोपाळ पत्रे, सुभाष देऊ साळगावकर, मंगलदास वासुदेव नाईक, संजय वसंत नाईक,

सचिव: अच्युत रामचंद्र गांवकर, गजानन उर्फ मुन्ना मांद्रेकर,तुळशिदास पांडुरंग घाडी,

सहखजिनदार: गिरिश तुकाराम नाईक

सभासद: दयानंद हरिश्चंद्र घाटवळ, अशोक मंगेश गांवकर, नारायण ऊर्फ मनोज साळगावकर, मनोहर वळवयकर, सज्जन नाईक, विनोद आजगावकर, संजय खर्बे, दामोदर पटेकर, प्रकाश मयेकर, उमेश वासु वळवयकर, देवानंद म्हातो, अरुण गांवकर, रामा मोरजकर, नरेंद्र वारखंडकर, लक्ष्मण मापारी, ज्ञानेश्वर वायंगणकर,योगेश आपा गांवकर, प्रशांत चोडणकर, प्रविण अनंत साळगावकर, किर्ती वायंगणकर, संतोष गोवेकर, अनिल घाडी, मंगलदास उसगावकर, दिलिप यशवंत खर्बे, कृष्णा महानंद चोडणकर, कनवी नितीन कवठणकर , आनंद पेटकर

सल्लागार: श्रीपाद उर्फ बापट कुंभारजुवेकर, शाम गांवकर, प्रदिप रेवोडकर, मंगलदास कांदोळकर, रामानंद नार्वेकर, नारायण मालवणकर, रमाकांत नाईक, प्रदिप नाईक, भानुदास नार्वेकर

या बैठकीत संपुर्ण डिचोली तालुक्यातील भंडारी समाजाचे सर्वेक्षण तथा शिरगणती करणे यावर चर्चा करण्यात. मये, डिचोली आणि साखळी मतदार संघातील ग्रामसमीत्यांचे गठण करुन प्रभागवार समाजाची शिरगणतीचे काम जलदगतीने पुर्ण करणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष सतिश गांवकर यांनी सांगितले. .

प्रास्ताविक सरचिटणीस हनुमंत नाईक यांनी केले. तस्लिमा मयेकर हिने पाहुण्यांना पुष्प देऊन स्वागत केले. सुत्रसंचालन काशिनाथ मयेकर यांनी केले. आभार प्रदर्शन सतिश गांवकर यांनी केले. यावेळी सुभाष फोंडेकर, राजेश कळंगुटकर,सज्जन नाईक, शाम शिरोडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीत भंडारी समाजबांधवांची लक्षणीय उपस्थिती होती.



**नवनिर्वाचित अध्यक्ष सतिश गांवकर यांचे अभिनंदन करताना केंद्रीय समिती अध्यक्ष उपेंद्र गांवकर,सोबत डिचोली कार्यकारिणी व केंद्रीय कार्यकारिणी पदाधिकारी**

**पाहिजेत**

Wanted one trained Undergraduate teacher having qualification B.Ed to teach Konkani. Hindi on Contract basis for 6 months. Walk-in-interview on 26th June 2025 at 9.00 am in Posh English High School, Navelim, along with application and all the testimonials.